# तंत्र शिक्षण संचालनालय , महाराष्ट्र राज्य, मुंबई

३ - महापालिका मार्ग , पोस्ट बॉक्स नं १९६७, मेट्रो सिनेमा समोर , मुंबई ४००००१
संकेतस्थळ : www.dtemaharashtra.gov.in ई मेल : director@dtemaharashtra.gov.in
फोन क्र : 91-022-2264 1150, 2264 1151, 2262 0601, 2269 0602


ई-परिपत्रक

क्र: ३/मडीजका/२०१७/ ०८
दि : ३०/०३/२०१७

प्रती,
प्राचार्य/ संचालक,
संचालनालया अंतर्गत सर्व शैक्षणिक संस्था,
महाराष्ट्र राज्य.

विषय : महाराष्ट्र डिजिधन जनजागृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे बाबत ...

निमुद्रिकरणानंतर भारत देश यशस्वीपणे कॅशलेस अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करत आहे. महाराष्ट्र शासन कॅशलेस अर्थव्यवस्थेच्या या उद्दिष्टाला पूर्ण करण्यासाठी अनेक अभिनव कार्यक्रम राबवत आहे. मुख्यमंत्री कार्यालय आणि तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने, तंत्रशिक्षण संचालनालय यांच्याशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कॅशलेस बनवण्यासाठी "महाराष्ट्र डिजिधन जनजागृती कार्यक्रम" राबविला जाणार आहे. या कार्यक्रमाची देखरेख आणि व्यवस्थापन मुख्यमंत्री कार्यालयामार्फत करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र डिजिधन जनजागृती कार्यक्रमाची रूपरेषा व कृती आराखडा सोबत जोडण्यात आलेला आहे. कॅशलेस व्यवहारांच्या सुविधेबाबत मार्गदर्शन आणि आवश्यक ती मदत मुख्यमंत्री कार्यालयामार्फत करण्यात येईल. या कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महाविद्यालयांना तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत सन्मानित करण्यात येईल. नावनोंदणी केल्यानंतर संबंधित महाविद्यालयांशी पुढील कार्यवाहीबाबत मुख्यमंत्री कार्यालयाकडून संपर्क साधण्यात येईल. सहसंचालक कार्यालयांनी त्याच्या अखत्यारीत असणाऱ्या संस्थाकडून http://bit.do/maha-dte लिंक वर जाऊन नोंदणी पूर्ण करून घेण्याबाबत सूचित करावे.

महाराष्ट्राला कॅशलेस बनवण्यासाठी आपले सहकार्य अपेक्षित आहे!

(चंद्रशेखर ओक भा. प्र. से.)
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

---

**कालमर्यादेत**
दि. 15/04/2017

पृ.क्र.तंशिस/प्राकाना/शैवि/2017/ 932
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
दिनांक:- /2017 07 APR 2017

प्रति,

प्राचार्य/संचालक
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात नमुद केल्यानुसार महाराष्ट्र डिजिधन जनजागृती कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी दि. 15/04/2017 पर्यंत न चुकता नोंदणी करावी.

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

## महाराष्ट्र डिजिधन जनजागृती कार्यक्रमाची रूपरेषा, कृती आराखडा:

उद्देश: महाविद्यालयातील उपहारगृह आणि इतर सर्व शुल्क व्यवहारांसाठी कॅशलेस पेमेंटची सुविधा उपलब्ध करून देणे.

प्राचार्यांची भूमिका:

१. महाविद्यालयातील उपहारगृहे आणि इतर सर्व शुल्क व्यवहार करणाऱ्या धारकांना कॅशलेस पेमेंटची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी परिपत्रक पाठवणे.

२. महाराष्ट्र डिजिधन जनजागृती कार्यक्रमाच्या व्यवस्थापनासाठी महाविद्यालयीन स्तरावर समन्वयकाची नेमणूक करणे आणि समन्वयकाच्या कार्याचा पाठपुरवठा करणे.
टीप: समन्वयकाच्या जबाबदारीसाठी आपण प्राध्यापक किंवा विद्यार्थी यांपैकी कोणाचीही नेमणूक करू शकता.

महाविद्यालयीन समन्वयकाची भूमिका:

१. आपल्या महाविद्यालयाबाबतचा आणि स्वतः बाबतचा तपशील खालील लिंकवर नमूद करणे.
http://bit.do/maha-dte माहिती भरण्याची शेवटची तारीख - १५.०४.२०१७

२. महाविद्यालयातील उपहारगृहे आणि इतर सर्व शुल्क व्यवहार करणाऱ्या धारकांना भेटून, पाठपुरावा करून कॅशलेस पेमेंटची सुविधा उपलब्ध करून देणे. उपाहारगृहांना कॅशलेस बनविण्यासाठी भीम ॲप/ युपीआय तसेच अन्य डिजिटल वॉलेटची सुविधा उपलब्ध करून द्यावी; तर, शुल्क भरण्यासाठी नेट बँकिंगची सुविधा उपलब्ध करून द्यावी.

३. मुख्यमंत्री कार्यालयाशी संपर्कात राहून कार्यक्रमासंबंधित सर्व माहिती पुरविणे.

या कार्यक्रमासंबंधित अधिक माहितीसाठी आणि मदतीसाठी आपण यांच्याशी संपर्क साधू शकता.
श्री. स्वप्नील पुरी (मुख्यमंत्री फेलो): ७३८७७०९२०६

----x----